# भारतीय राजकारणातील
# नेहरू पर्व



संपादक

डॉ. पंजाब चव्हाण

डॉ. रामचंद्र भिसे

प्रा. हनुमंत जवळगे

प्रा. मुकुंद येगावकर

ISBN No.-81-86584-00-8

भारतीय राजकारणातील नेहरूपर्व

**Nehru Era in Indian Politics**

प्रकाशक

Avon Publications

Regd. Off. 9, Wadhwa Complex

Ground Floor, D-288/10,

Laxmi Nagar, Delhi-110092.

संपादक मंडळ

डॉ. पंजाब चव्हाण - ९४०५३८४२५१

डॉ. रामचंद्र भिसे - ९९७५७०४२३५

प्रा. हनुमंत जवळगे - ९४२३६५७२२६

प्रा. मुकुंद येगांवकर -९४०४५०६३८९

अक्षरजुळवणी

गजानन बोखारे,

वरद कॉम्प्युटर, चैतन्यनगर रोड,

नांदेड. मो. ९८८१३६५१८७.

मुखपृष्ठ

गजानन बोखारे,

नांदेड

मुद्रण

रामाकृष्णा प्रिंटर्स, हैदराबाद.

आवृत्ती - प्रथम एप्रिल २०१३

मूल्य - रु. ४५०.०० केवळ

या ग्रंथात समाविष्ट शोधनिबंधातील संशोधनाशी, वैचारिक मतांशी संपादक, प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# "भारतीय परराष्ट्र धोरण आणि नेहरू"

**प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम**
इतिहास विभागप्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

आधुनिक भारताच्या इतिहासात आणि राजकारणात ज्या प्रभावशाली, प्रतिभावंत व महान व्यक्तीरेखा होऊन गेल्या त्यामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागते. आधुनिक भारताच्या पायाभरणीत आणि जडणघडणीत नेहरूंचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे. भारतात संसदीय लोकशाहीचा खऱ्या अर्थाने पाया नेहरूंनी रचला म्हणून त्यांचा गौरव आधुनिक भारताचे जनक असाही केला जातो. स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाचे व आंतरराष्ट्रीय अलिप्ततावादाचे ते खरे शिल्पकार ठरतात. नेहरूंच्या बाबतीत असे म्हणता येईल की, ते समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, राजकारण व आंतरराष्ट्रीय राजकारणावर ते अधिकारवाणीने भाष्य करतात म्हणून नेहरू एक व्यक्ती नसून ती एक विचार संस्था होती. नार्मल कोसन च्या शब्दात सांगावयाचे झाले तर

"नेहरू एक व्यक्ती नसून ते अनेक व्यक्तींचा मोर्चा होते."

"Nehru was not one man but a procession of man."

ब्रिटिशांच्या राजकीय गुलामगिरीतुन मुक्त होण्यासाठी इ.स.१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्त्व राष्ट्रीय काँग्रेसने केले. या राष्ट्रीय चळवळीमध्ये इ.स.१९१५ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंनी प्रवेश केला. इ.स.१९२० मध्ये असहकार चळवळीत सहभाग घेतला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने इ.स.१९२१ च्या दिल्ली येथील अधिवेशनात परराष्ट्र धोरणासंबंधीचा एक ठराव संमत करण्यात आला या ठरावात शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध जोडण्याचा आग्रह धरण्यात आला. त्यानंतर इ.स.१९२८ मध्ये कोलकत्ता येथे भरलेल्या अधिवेशनात राष्ट्रीय काँग्रेसने आपला एक वेगळा परराष्ट्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि नेहरू यांची परराष्ट्र विभागाच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली. स्वातंत्र्याच्या प्रदिर्घ लढयानंतर १५ ऑगस्ट १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि पहिले परराष्ट्रमंत्री म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तत्पुर्वी ७ सप्टेंबर १९४६ रोजी नेहरूंनी केलेल्या भाषणात देशाच्या परराष्ट्र

धोरणाचे स्वरुप स्पष्ट केले. त्यांनी देशाच्या परराष्ट्र धोरणाची स्वतंत्रपणे आखणी केली. त्यांनी आखलेल्या धोरणापासून आजपर्यंत कोणतेही सरकार किंवा कोणताही पंतप्रधान दूर गेलेला नाही. सर्वांनीच नेहरूजींच्या परराष्ट्र धोरणाला अनुसरूनच आपले परराष्ट्र धोरण आखले. यावरुन नेहरूंनी आपल्या देशाच्या परराष्ट्र धोरणाचा पाया किती भक्कमपणे रोवला याची आपल्याला कल्पना येते.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षितिजावर नव्यानेच उदयास आलेल्या राष्ट्रसभे समोर अनेक प्रश्न होते. त्यापैकी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण होय. हे धोरण ठरवित असतांना पंडित नेहरूंनी अतिशय विचारपूर्वक जाणीवपूर्वक अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याच्या सुमारास जगाची विभागणी दोन गटात झालेली होती. एका गटाचे नेतृत्त्व लोकशाहीवादी अमेरिका तर दुसऱ्या गटाचे नेतृत्त्व साम्यवादी रशिया करीत होते. यां दोन्ही महासत्ता आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी त्यांच्यात वेगवेगळया बाबतीत स्पर्धा सुरू झाली. तसेच नवोदित स्वातंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्यासाठी चढाओढ सुरू झाली आणि आपल्या गटात ओढून आपल्या विचाराच्या आणि इतर बाबतीत आपल्या दावणीला बांधणे व आपल्या बळामध्ये वाढ करणे ते करीत आसता अमेरिकेने मित्र राष्ट्रांना एकत्र करुन नाटो करार, सिएटो करार, सेंटो करार या सारखे लष्करी करार घडून आणले तर रशियाने वार्सा करार करुन युरोपातील व आशियातील साम्यवादी राष्ट्रांना आपलेसे करुन घेतले. अशा प्रकारच्या लष्करी करारांमूळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पुन्हा शीतयुद्धाची परिस्थिती निर्माण झाली. अशा परिस्थिती युद्धाचा भडका उडण्यास किंवा तीसरे महायुद्ध पेटण्यास एखादी शुल्लक घटनाही कारणीभूत ठरू शकते व जगाची शांतता भंग पावली जाऊ शकते. आशा परिस्थितीत आपण कोणत्या गटात सामील व्हावे. लोकशाहीचे नेतृत्त्व करणाऱ्या अमेरिकेच्या गटात जावे तर साम्यवादी रशिया विनाकारण आपला शत्रु बनले. खरतड प्रवासाअंती आपला देश स्वतंत्र तर झाला पण भावी देशाचे परराष्ट्र धोरण आखणे म्हणजे नेहरूजीसाठी तारेवरची कसरत होती म्हणून त्यांनी आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखले ते म्हणजेच गट-निरपेक्ष म्हणजेच अलिप्ततावाद.

नेहरूंनी अलिप्ततावादी धोरणाचा अंगीकार का केला याचे मुख्य कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणापासून आपल्या देशाला अलिप्त ठेवणे हा नाही तर

अमेरिका किंवा रशिया यापैकी कोणत्याही एका गटात सहभागी होणे म्हणजे आपल्या परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत स्वातंत्र्याचा बळी देणे होय. त्यामूळे आपल्या देशाचे परराष्ट्र धोरणाचे स्वातंत्र्य आबाधित राखण्यासाठी नेहरूजींनी या दोन्ही गटापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला. पण जागतिक राजकारणापासून पलायन केलेले नाही तर वरील दोन्ही गटांपासून जगातील जे राष्ट्र आपल्या प्रमाणे अलिप्त राहू इच्छितात अशा राष्ट्राचा एक स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी नेहरूजींनी पुढाकार घेतला त्यातुनच आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी चळवळीची सुरूवात झाली आणि भारत देश नेहरूमूळे या चळवळीचा अद्यप्रवर्तक ठरला.इ.स.१९५९ मध्ये अलिप्ततावादी चळवळीची एक परिषद बांडूंग येथे आयोजीत केले. त्यावेळी जगातील २९ देशांनी सहभाग घेतला. त्यानंतरही अशा परिषदेस त्यांनी चालना दिली. नेहरूजींनी अलिप्ततावादी धोरणाचा अर्थ मोठया समर्पकतेने मांडला ते म्हणतात अलिप्ततावाद म्हणजे साम्राज्यवादास विरोध, युद्धास विरोध, लष्करी गटबाजीस विरोध, लष्करी गटाचे सभासद होण्यास विरोध विशेषत: या सर्व घटनांना विरोध म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात तीसरा गट निर्माण करणे नव्हे तर या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण आपण स्वत: ठरवीणे, त्यावर इतर राष्ट्राचे नियंत्रण मान्य न करणे म्हणजेच घ्शांततामय सहअस्तित्त्वास मान्यताङहोय. थोडक्यात असे म्हणता येईल की, जागतिक शीतयुद्धाची तिव्रता कमी करण्यासाठी युद्ध टाळावे व आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी अलिप्ततावादी धोरण आवश्यक आहे. याचसाठी नेहरूंनी ही संकल्पना मांडली.

नेहरूजींच्या परराष्ट्र धोरणाचे दुसरे आणि महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे घ्पंचशील तत्त्वङ होय. रविंद्रनाथ टागोरांच्या आंतरराष्ट्रीयवादाच्या भावनेने नेहरू प्रभावित झालेले होते. म्हणूनच त्या जागतिक राजकारणा शांतता, सहकार्य, आत्मीयता व प्रेम वृद्धिंगत व्हावे व जगात शांतता आणि सुव्यवस्था नांदावी म्हणून नेहरूजींनी परराष्ट्र धोरणात पंचशील तत्त्वाचा अंगीकार केला. पंचशील या तत्त्वाचा अर्थ स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्रांनी परस्परांशी मैत्रीपूर्ण व्यवहार करत असतांना आचरणात आणावयाची पाच तत्त्वे होते. नेहरूंनी राष्ट्राराष्ट्रातील संबंधाबाबत पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला तसेच शेजारी राष्ट्रसंबंधात पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला. त्यामूळे या पंशील धोरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी धोरणाप्रमाणेच वेगळा प्रभाव निर्माण झाला

ऐवढेच नाही तर लोकशाहीवादी भारत आणि भारताच्या शेजारी आणि लोकसंख्येच्या दृष्टिने जगात नंबर एक असलेल्या साम्यवादी चीन या देशाने पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला. आशिया खंडात प्राचीन काळापासून या दोन्ही राष्ट्रांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. या खंडातील बलशाली राष्ट्रे म्हणून या राष्ट्रांकडे पाहीले जाते. तेंव्हा आपल्या शेजारी राष्ट्राशी आपण सहकार्यपूर्ण व मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करावेत अशी भारतातील आणि चीनमधील नेत्यांची इच्छा होती. त्यामूळे पंचशील तत्त्वाचा स्वीकार दोन्ही राष्ट्रांनी केला त्यातुनच भारत आणि चीन यांच्यात मैत्री निर्माण झाली. पंचशील तत्त्वानुसार इ.स.१९५४ मध्ये भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि चीन चे पंतप्रधान चौ-यन-लाय यांच्यात मैत्रीचा एक करार घडून आला आणि हिन्दी चीनी भाई भाई असे नारे देण्यात आले. याच कराराच्यावेळी दोन्ही राष्ट्रांनी पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला ती पंचशील तत्त्वे

१) परस्परांची प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्त्वाचा परस्परांनी सन्मान राखणे.

२) परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे.

३) परस्परांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप न करणे.

४) परस्पर समानता व हितसंबंध जोपासणे.

५) शांततामय सहजीवन

या पंचशील तत्त्वामूळे आंतरराष्ट्रीय राजकारणा भारत आणि नेहरूंची एक वेगळी प्रतिमा निर्माण झाली. तसेच भारत आणि चीन या राष्ट्राबरोबरच अनेक राष्ट्रांनी या पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला. इ.स.१९५५ मध्ये ॲफ्रो-आशियाई राष्ट्रांची बांडूंग येथे एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यात जगातील २९ राष्ट्रांनी पंचशील तत्त्वास मान्यता दिली. याखेरीज जगतील अनेक राष्ट्रप्रमुखांनी पंचशील तत्त्वाचा गौरव केला. याच तत्त्वामूळे आंतरराष्ट्रीय संघर्ष आणि राष्ट्रराष्ट्रातील ताणतणाव कमी होण्यास आणि शांततामय सहजीवनास मदत होईल असे अनेक राष्ट्रांना वाटत होते. याच तत्त्वानुसार सार्वभौम राष्ट्रांनी परस्पराविषयी आदर बाळगावा परस्परात मित्रत्त्वाचे संबंध प्रस्थापित व्हावेत आपआपसात सहकार्य वाढावे आणि परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करता परस्पराच्या सार्वभौमत्त्वाचा आदर आणि सन्मान करावा या तत्त्वावर भर देण्यात आला. संबंधीत राष्ट्रांनी या तत्त्वाचे काटेकोरपणे आणि निष्ठेने पालन केल्यास जगात शांतता प्रस्थापित होण्यात वेळ लागणार नाही आणि शेजारी

राष्ट्रात तर निश्चितच आदर्शवत मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील.

परंतु दुर्दैवाने पंचशील तत्त्वाचा स्वीकार करणाऱ्या साम्यवादी चीन या देशाने इ.स.१९६२ मध्ये पंचशील तत्त्वे पायदळी तुडवीले भारताशी विश्वासघात करुन उत्तर भारताच्या प्रदेशावर आक्रमण केले. चीन च्या या विश्वासघातकी प्रवृत्तीतून हे सिद्ध होते की, या तत्त्वाचा वापर त्याने आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक डावपेच असाच केला म्हणजे पंचशील तत्त्वाचा अंगीकार चीन ने कधीच मनापासून केला नाही. म्हणून चीन या देशाने केलेल्या विश्वासघातकी कृत्याचा संबंध नेहरूंच्या पंचशील तत्त्वाच्या अपयशाशी जोडणे चुकीचे ठरते. कारण एखादया राष्ट्राने प्रत्यक्ष प्रमाणिकतेमध्ये किंवा विश्वासु व्यवहारामध्ये सरळ चालतांना अप्रामाणिक वृत्ती दाखविलीच तर पंचशील तत्त्वच काय कोणतेही आदर्शवत तत्त्व अशा प्रवृत्तीच्या राष्ट्राशी यशस्वी होईल याची आशा बाळगता येणार नाही. त्यामूळे चीन या देशाने अशी दूराग्रही प्रवृत्ती दाखविली तरी नेहरूंच्या पंचशील तत्त्वाचे महत्त्व कमी होणार नाही आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात जे भारताला स्थान प्राप्त झाले त्यात फरक पडणार नाही.

नेहरूंनी जागतिक शांततेसाठी चालविलेल्या प्रयत्नामूळे त्यांचा जगात सर्वत्र आदर आणि सन्मान केला जातो. त्या बरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक अग्रगण्यनेते म्हणून त्यांना मान्यता मिळाली. भारताचे अलिप्ततावादी धोरण आणि पंचशील तत्त्व आंतरराष्ट्रीय शांततेसाठी हितकारक आहे याची कबुली महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या राज्यकर्त्यांनी दिली. भारतभूमीने प्राचीन काळापासून जगाला शांतीचा संदेश दिला तीच भूमिका तेच धोरण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आखले त्यांनी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नामूळे आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचा घ्शांतिदूतङ म्हणून गौरव केला जातो. म्हणूनच आज आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या भूमिकेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

**संदर्भ सूची :-**

१) डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर २०११.

२) डॉ.कठारे अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशान नांदेड, व्दि.अ.-१९९८.

३) प्रा.कुलकर्णी बी.वाय., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती

प्रकाशन,लातूर, - २००७.

४) प्रा.पाटील व्ही.बी. व के.सागर, भारताचे परराष्ट्र धोरण, के सागर पब्लिकेशन्स, पुणे,

५) डॉ.गुप्ता मानिकलाल, आधुनिक भारत का इतिहास, साहित्य रत्नालय, कानपूर, - २००७.

६) डॉ.देशमुख अल्का, भारतीय समाज आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन , नागपूर, - २००३.